यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

आणि

कुसुमाग्रज अध्यासन

ज्ञानगंगा घरोघरी

# ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ अहवाल

१४ जानेवारी ते २८ जानेवारी

२०२३

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल**

महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग यांच्या दिनांक ११ नोव्हेंबर २०२२ या शासन परिपत्रकानुसार दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी, २०२३ या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या पंधरवड्यात कोणते उपक्रम घेता येतील याची चर्चा करून निश्चिती करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीत खालील सदस्यांचा समावेश होता.

१) प्रा.डॉ.प्रवीण घोडेस्वार,प्र. संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

२) डॉ.प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल

३) श्रीमती पूनम वाघ, शैक्षणिक संयोजक

४) डॉ. स्नेहा राठोड , शैक्षणिक संयोजक

५) डॉ.दयाराम पवार , शिक्षणशास्त्र विद्याशाखा

६) श्री. संतोष साबळे, दृकश्राव्य निर्मितीकेंद्र

७) श्री.प्रेमनाथ सोनवणे,नोंदणी व परीक्षा केंद्र

मराठी भाषेचा प्रसार आणि प्रचार करणे हे महाराष्ट्र शासनाचे मुख्य धोरण समोर ठेवून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक. येथे देखील 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या पंधरवड्याचे आयोजन मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा तसेच कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे

**१)निबंध स्पर्धा:**

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा तसेच कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने १६ जानेवारी २०२३ रोजी 'निबंध स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले होते. ह्या स्पर्धे साठी दोन गट करण्यात आले होते.

पहिला गट नियमित सहकाऱ्यांचा (शिक्षक,शिक्षकेतर), दुसरा गट (करारावरील अधिकारी कर्मचारी, दैनदिन वेतनावरील कर्मचारी) या सर्वांसाठी करण्यात आले होते. निबंध लेखनाचा तपशील खालीलप्रमाणे:

- निबंधाचे विषय: आठवणीतलं मराठी गाणं,  किंवा माझा आवडता दूरचित्रवाणीवरील मराठी कार्यक्रम (कोणताही एक)
- शब्द मर्यादा -५०० ते ७०० शब्द

निबंधाचा विषय दैनदिन जीवनाशी निगडीत आणि अगदी आगळावेगळा असल्याकारणाने मोठ्या प्रमाणात निबंधासाठी प्रतिसाद मिळाला. परीक्षकांनी निवडलेल्या दोन्ही गटातील(नियमित कर्मचारी आणि करारावरील, दैनदिन वेतनावरील) प्रत्येकी पाच विजेत्यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या विजेत्यांना २७ फेब्रुवारी २०२३ रोजी मराठी भाषा दिनाच्या कार्यक्रमात  सन्मानित करण्यात येईल.

**२)मुद्रितशोधन कार्यशाळा:**

आजच्या काळातील मुद्रितशोधनाचे महत्त्व आणि उपयुक्तता लक्षात घेता मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा तसेच कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने  २८जानेवारी २०२३ रोजी ‘मुद्रितशोधन कार्यशाळेचे ’ आयोजन करण्यात आले होते. मुद्रितशोधन कार्यशाळेचा  तपशील खालीलप्रमाणे:

- कार्यशाळेचा विषय: मुद्रितशोधन :का आणि कसे?
- दिनांक: शनिवार, २८ जानेवारी २०२३
- वेळ: सकाळी ११.३० ते १.३०
- ठिकाण: शैक्षणिक इमारतीमधील सभागृह

या कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून विद्यापीठाच्या ग्रंथनिर्मिती केंद्रातील मुद्रितशोधक श्रीविजय चव्हाण व त्यांचे सहकारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या अध्ययन साहित्याचे मुद्रितशोधन करण्याचे मोठ्या प्रमाणात काम

श्री.विजय चव्हाण यांनी केले आहे. त्यांचे या क्षेत्रातील अनुभव दांडगा आहे व्याकरणातील होणाऱ्या किरकोळ चुका, तसेच ऱ्हस्व आणि दीर्घ यातील बदल झाल्यामुळे शब्दांचा बदलणारा अर्थ त्यातून घडणाऱ्या गमती जमती हे सर्व त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यशाळेसाठी विद्यापीठातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. पी.बी.पाटील सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे प्र. संचालक प्रा.डॉ.प्रवीण घोडेस्वार यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पूनम वाघ व आभार प्रदर्शन डॉ.स्नेहा राठोड यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.